# राष्ट्रीय खाद्यतेल तेलबिया अभियाना (National Mission on Edible Oils - Oilseeds) अंतर्गत विशेष शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन

नांदेड येथील कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी आणि कृषि विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय खाद्यतेल तेलबिया अभियाना (National Mission on Edible Oils - Oilseeds) अंतर्गत विशेष शेतकरी प्रशिक्षणाचे आयोजन १२ ऑगस्ट २०२६ रोजी केविके, पोखर्णी येथे यशस्वीरीत्या पार पडले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील शेतकऱ्यांना तेलबिया पिकांच्या प्रगत उत्पादन तंत्रज्ञानाची माहिती देणे आणि देशात खाद्यतेलाचे उत्पादन वाढवून आत्मनिर्भरता मिळवणे हा होता.या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. एस.डी मोरे संचालक, कृषि विज्ञान केंद्र पोखर्णी तसेच डॉ. देविकांत देशमुख वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख तसेच डी. व्ही. नागुरे मंडळ कृषि अधिकारी कृषि विभाग नांदेड, प्रा. माणिक कल्याणकर (पिक संरक्षण तज्ञ),प्रा. संदीप जायभाये (कृषि विद्या तज्ञ) सौं. अलका पवळे गृह विज्ञान तज्ञ)तसेच डॉ. अमिता क्षत्रिय (कृषि विस्तार तज्ञ) हे मंचावर उपस्थित होते.

## प्रशिक्षणातील प्रमुख मुद्दे व मार्गदर्शन:

### सुधारित व आणि वाणांची निवड:

सोयाबीन, भुईमूग, तीळ, आणि सूर्यफूल यांसारख्या तेलबिया पिकांच्या कीड-रोगप्रतिकारक आणि अधिक उत्पादन देणाऱ्या वाणांची निवड कशी करावी यावर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

### एकात्मिक अन्नद्रव्य व कीड व्यवस्थापन (IPM & INM):

मातीपरीक्षणानुसार खतांचा संतुलित वापर, जैविक खतांची (उदा. रायझोबियम, पीएसबी) बीजप्रक्रिया, तसेच पिकांवरील किडी व रोगांच्या प्रतिबंधात्मक उपायांवर प्रकाश टाकण्यात आला.

### पाणी व आंतरमशागत व्यवस्थापन:

तेलबिया पिकांमध्ये सूक्ष्म सिंचन पद्धतीचा (ठिबक व तुषार सिंचन) वापर करून पाण्याचे नियोजन कसे करावे आणि आंतरपिकांचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली.

### शासकीय योजना व अनुदान:

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानांतर्गत शेतकऱ्यांना मिळणारे बियाणे, आणि इतर अनुदानाबाबत सविस्तर माहिती दिली.

**विशेष संदेश:**

"तेलबिया पिकांची उत्पादकता वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, वेळेवर बीजप्रक्रिया आणि एकात्मिक पीक संरक्षण पद्धतींचा अवलंब करणे अत्यंत गरजेचे आहे."

या प्रशिक्षण कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यातील अनेक शेतकरी बंधू-भगिनी, कृषि विज्ञान केंद्रातील विषय विशेषज्ञ आणि कृषि विभागाचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.























